भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# घातक अपघात अधिनियम, १८५५

**( सन १८५५ चा अधिनियम क्रमांक १३)**

[दिनांक ३१ मार्च, २००० रोजी यथाविद्यमान]

# The Fatal Accident Act, 1855

**(Act No. 13 of 1855)**

**[ As in force on the 31st March, 2000]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ३.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ मार्च, २००० रोजी यथाविद्यमान असलेला फेटल ॲक्सिडेंट ॲक्ट, १८५५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ११, अंक १, दिनांक २२ जून, २०००, यात पृष्ठ ४१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता. आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ ,उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली.
दिनांक २२ जून, २०००.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Fatal Accident Act, 1855 as on the 31st March, 2000, contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Volume 11, dated 22nd June 2000 on page 41.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 22nd June, 2000.

DR. SUBHASH C. JAIN,
Secretaryto the Government of India.

# घातक अपघात अधिनियम, १८५५

## कलमांचा क्रम

कलमे

प्रस्ताविका

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

१ क. कारवाई योग्य अपकृतीमुळे झालेल्या एखाद्या व्यक्तीच्या कुटुंबाच्या हानीबद्दल त्याला भरपाई देण्यासाठी दावा.

२. एकापेक्षा अधिक दावे दाखल केले जाणार नाहीत. संपदेच्या हानीसाठी आणखी दावा करता येईल.

३. वादी तपशील इत्यादी देईल.

४. निर्वाचण खंड.

एच ४२४८—२(१०३५—१-२००४)

# घातक अपघात अधिनियम, १८५५
## (सन १८५५ चा अधिनियम क्रमांक १३)

(३१ मार्च, २००० रोजी यथाविद्यमान)

[२७ मार्च, १८५५]

**कारवाई योग्य अपकृतीमुळे एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याने उद्‌भवलेल्या हानीपोटी कुटुंबियांना भरपाई देण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी**, एखाद्या व्यक्तीने तिचे गैरकृत्य, हयगय वा कसूर यामुळे अन्य व्यक्तीचा मृत्यू घडवून आणला असता तिच्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात आता कारवाई वा दावा चालवला जाऊ शकत नाही आणि तिच्याकडून अशाप्रकारे झालेल्या क्षतीबद्दलच्या नुकसानभरपाईसाठी अशा प्रकरणातील गैरकृत्य करणारी व्यक्ती उत्तरदायी असणे बरेचदा बरोबर व इष्ट असते. **त्याअर्थी**, खालीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :— प्रस्ताविका.

१. (१) या अधिनियमास घातक अपघात अधिनियम, १८५५ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्ये खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

१क. जेव्हा जेव्हा एखाद्या व्यक्तीचा मृत्यू गैरकृत्य, हयगय वा कसूर यामुळे घडून आला असेल आणि ते गैरकृत्य, हयगय वा कसूर ही जर अशी असेल (जर मृत्यूनंतर घडून आलाच नसता तर) जीमुळे ती क्षती पोहोचलेल्या पक्षाला कारवाई चालू ठेवण्याचा आणि त्यासंबंधीचा नुकसानभरपाई वसूल करण्याचा हक्क प्राप्त होत असेल तेव्हा तेव्हा मृत्यूनंतर घडून आला नसता तर, जो पक्ष पात्र ठरला असता असा क्षती पोहोचलेल्या व्यक्तीचा मृत्यू घडून आला असला तरीही आणि कायद्याच्या दृष्टीने जो घोर अपराध वा अन्य गुन्हा ठरू शकेल अशा परिस्थितीत मृत्यू घडून आला असला तरीही, नुकसान-भरपाईची कारवाई वा दावा करण्यास पात्र ठरेल. कारवाई योग्य अपकृतीमुळे झालेल्या एखाद्या व्यक्तीच्या कुटुंबाच्या हानीबद्दल त्याला भरपाई देण्यासाठी दावा.

अशी प्रत्येक कारवाई वा दावा, अशा तऱ्हेने मृत्यू घडून आला असेल त्या व्यक्तीची, असल्यास पत्नी, पती, पालक वा मूल यांच्या हितार्थ असेल आणि तो दावा मृत व्यक्तीचा मृत्यूपत्र व्यवस्थापक, प्रशासक किंवा प्रतिनिधी यांच्याकडून आणि त्यांच्या नावे लावण्यात येईल ;

आणि अशा प्रत्येक कारवाईमध्ये वा दाव्यामध्ये, ज्याच्यासाठी आणि ज्यांच्या हितासाठी अशी कारवाई करण्यात आली असेल, अनुक्रमे त्या पक्षांना अशा मृत्यूमुळे झालेल्या हानीच्या प्रमाणात न्यायालयाला योग्य वाटेल अशी नुकसानभरपाई भरून देता येईल आणि अशा तऱ्हेने वसूल केलेली रक्कम, प्रतिवादी कडून वसूल न केलेल्या खर्चासह सर्व परिव्यय व खर्च वजा करून, उपरोक्त पक्षांना वा त्यांच्यापैकी कोणालाही, न्यायालय, आपला न्यायनिर्णय वा हुकूमनामा याद्वारे निर्देशित करील अशा हिश्श्यांमध्ये विभागून देण्यात येईल.

२. परंतु, फिर्यादीच्या एकाच विषयवस्तूसाठी आणि त्यासंबंधात, एकापेक्षा अधिक कारवाई वा दावा दाखल केला जाणार नाही : एकापेक्षा अधिक दावे दाखल केले जाणार नाहीत.

परंतु, अशा कोणत्याही कारवाईत वा दाव्यात मृत व्यक्तीचा मृत्यूपत्र व्यवस्थापक, प्रशासक वा प्रतिनिधी असे गैरकृत्य, हयगय वा कसूर यामुळे उद्‌भवलेल्या मृत व्यक्तीच्या संपदेच्या झालेल्या कोणत्याही आर्थिक हानीसंबंधात हक्क मागणी करू शकेल आणि वसुली करू शकेल, ती रक्कम वसूल केल्यानंतर मृत व्यक्तीच्या संपदेच्या मत्तेचा भाग असल्याचे समजण्यात येईल. संपदेच्या हानीसाठी आणखी दावा करता येईल.

३. अशा कोणत्याही कारवाईतील वा दाव्यातील वादपत्रामध्ये, ज्यांच्यासाठी वा ज्यांच्या वतीने अशी कारवाई वा दावा दाखल करण्यात येणार असेल त्या व्यक्तींचा वा व्यक्तींचा संपूर्ण तपशील आणि ज्यासंबंधात नुकसानभरपाई मागण्यात येईल त्या दाव्याचे स्वरूप नमूद केले जाईल. वादी तपशील इत्यादी देईल.

४. खालील शब्द व शब्दप्रयोग यांना, याद्वारे अनुक्रमे नेमून दिलेले अर्थ, तसे अर्थ संदर्भाद्वारे वा विषयवस्तूच्या स्वरूपाद्वारे वर्जित केले नसतील तोपर्यंत, असतील ते म्हणजे "व्यक्ती" हा शब्द राज-निकाय व निगम निकाय यांना लागू होईल ; आणि "पालक" या शब्दामध्ये पिता व माता आणि आजा व आजी यांचा समावेश होतो, आणि "बालक" या शब्दात पुत्र व कन्या, आणि नातू व नात आणि सावत्र मुलगा व सावत्र मुलगी यांचा समावेश होतो. निर्वाचन खंड.